MHWS100010552023

**म.कौ.हिं.सं.का.अर्ज. क्र. २४/२०२३**
पुजा – वि – संतोष व इतर

## आदेश निशाणी क्रमांक ०३ खालील

( दिनांक २०/०२/२०२६ रोजी पारित )

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार पुजा संतोष काळदाते हिने कौटुंबीक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत कलम २३ प्रमाणे दरमहा १५ हजार रुपये अंतरीम खावटी मिळण्याकरीता गैरअर्जदारांविरुध्द दाखल केलेला आहे.

२. सदर प्रकरणात सर्व गैरअर्जदार विधीज्ञ श्री.व्ही.जे.गवळी यांच्यामार्फत हजर झालेले आहेत. सदर प्रकरणात सर्व गैरअर्जदार हजर होवुनसुध्दा त्यांनी सदरील अर्जास त्यांचे म्हणणे दिलेले नाही, सबब, सदरील अर्जावरील दिनांक ०१/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदरील अर्ज गैरअर्जदारांविरुध्द विना म्हणण्याविरुध्द चालविण्यात येत आहे.

३. अर्जदार हिचे कथने, अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केल्यानंतर माझ्यासमक्ष निर्णयाकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष व समर्थनार्थ करणे मी खालीप्रमाणे नमुद केलेले आहेतः

| **अनुक्रमे** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हिने दाखल केलेल्या अंतरीम खावटीच्या मागणीस ती पात्र आहे काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्जदार पुजा हीला दरमहा ४,०००/– रुपये अंतरीम खावटी अर्ज दाखल तारखेपासुन मंजुर करण्यात येते. |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र १ व २ करीता</u>**

४. अर्जदार हिचे विधीज्ञ श्री.के.डी.चतरकर आणि गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांचे विधीज्ञ श्री. व्ही. जे. गवळी यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अभिलेखाची पडताळणी केली असता माझ्या असे निदर्शनास येते की, अर्जदार पुजा हिने निशाणी क्र. १२ दिनांक १४/०२/२०२५ रोजी अन्वये मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे स्वतःच्या मालमत्तेबाबत शपथपत्र दाखल केलेले आहे. अर्जदार पुजा हिच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता असेसुध्दा निदर्शनास येते की, अर्जदाराने तिच्या शपथपत्रात तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याबाबतचे नमूद केलेले आहे.

६. अंतरीम खावटीचा अर्ज निकाली काढतांना कोणताही गणितीक सिध्दांत उपलब्ध नाही. अंतरीम खावटीचा अर्ज निकाली काढतांना अर्जदार तसेच गैरअर्जदार या दोघांचे राहणीमान तसेच त्या दोघांची जिवन शैली आणि गैरअर्जदारावर असलेल्या जबाबदारी या सगळयांची शहनीशा करुन सदरचा अर्ज निकाली काढावा लागतो.

७. अभिलेखाची पडताळणी केली असता माझ्या असे निदर्शनास येते की, गैरअर्जदारांनी हजर होवुनसुध्दा सदरील अर्जावर त्यांचे म्हणणे दिलेले नाही. सबब, अर्जदाराच्या कथनास गैरअर्जदारांनी कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतलेला दिसुन येत नाही.

८. अभिलेखाची पडताळणी केली असता प्रथमदर्शनी माझ्या असे निदर्शनास येते की, गैरअर्जदार क्र. १ संतोष याच्याकडे शेती व किराणा दुकान आहेत, सदरच्या शेती व किराणा दुकानातुन गैरअर्जदार क्र.१ संतोष हा दरमहा अंदाजे १५ ते २० हजार रुपये उत्पन्न घेतो. अर्जदाराच्या पालन पोषनाची सर्वस्व जबाबदारी गैरअर्जदार क्र १ संतोष याची आहे. मुळ अर्ज निकाली निघण्यास वेळ लागणार आहे त्यामुळे अर्जदार पुजा हिच्या तसेच गैरअर्जदार क्र १ संतोष यांच्या राहणीमानाचा विचार करता, तसेच गैरअर्जदार क्र. १ संतोष याच्या आर्थिक परिस्थिती आणि त्याच्यावर असलेल्या जबाबदारीचा विचार करता अर्जदार पुजा हिला दरमहा ४,०००/– रुपये (चार हजार रुपये मात्र) अंतरीम खावटी मुख्य अर्जाचा निकाल लागेपर्यंत देणे संयुक्तीक होईल. सबब, मी मुद्दा क्र १ चे उत्तर होकारार्थी देत आहे आणि मुद्द क्र २ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ संतोष विठ्ठल काळदाते याने अर्जदार पुजा संतोष काळदाते हिला दरमहा ४,०००/– रुपये (चार हजार रुपये मात्र) सदरचा अंतरीम खावटीचा अर्ज दाखल केलेल्या दिनांकापासुन मुख्य अर्ज निकाली निघेपर्यंत द्यावे.

[आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.]

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.02.20 17:44:12 +0530

( **एम.डब्लु.ए.एम.जे.शेख** )

दि. २०/०२/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (कोर्ट क्र.१),
मालेगांव

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 20/02/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 20/02/2026 |
| Judgment /Order uploaded on | 20/02/2026 |